दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरुपात...
दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष-२ ■ अंक-२७ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ६ फेब्रुवारी २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669







**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# शिंदे साहेबांच्या मार्गदर्शनाखालीच दिव्याचा विकास होईल –निलेश पाटील

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांचं विकासाचे व्हिजन लक्षात घेऊनच आम्ही शिंदे साहेबांच्या नेतृत्वाखाली काम करायला सुरुवात केली. दिवा शहरात पूर्वी ज्या समस्या होत्या त्या समस्यांचा बारकाईने अभ्यास करून एकनाथ शिंदे साहेब आणि श्रीकांत शिंदे साहेब यांनी येथील समस्या सोडवण्यास प्राधान्य दिले. दिवा शहरातील विकास कामांसाठी मागील पाच वर्षात मिळालेला निधी हा विक्रमी स्वरूपाचा आहे. दिवा शहरातील गटार बांधणी असो,सिमेंट काँक्रीटचे रस्ते त्याचबरोबर दिवा-आगासन हा मुख्य रस्ता, दिवा साबे हा सिमेंट काँक्रीटचा रस्ता अंतर्गत रस्ते प्रमुख मुख्य रस्त्यांची कामे, मागील पाच वर्षात झालेली आपल्याला पाहायला मिळतात. भौगोलिक दृष्ट्या फार मोठा असणारा दिवा प्रभाग, या दिवा प्रभागाच्या विकासासाठी महापालिकेमार्फत मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला.शहर प्रमुख व माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वाखाली दिव्यात काम होत असताना, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शहराच्या विकासाची वाटचाल सुरू आहे. शिंदे साहेबांनी दिवा शहरासाठी जी जी आश्वासन दिली आहेत ती पाळली आहेत. त्यामुळे दिवा शहराचा विकास हा एकनाथ शिंदे साहेब यांच्याच मार्गदर्शनाखाली होऊ शकतो. हा विश्वास दिव्यातील जनतेला आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

– **निलेश बाळाराम पाटील,** विभाग प्रमुख, साबे ( दिवा ) (बाळासाहेबांची शिवसेना)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# जो शब्द शिंदेसाहेब देतात तो पूर्ण करतात...

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली दिवा आदर्श शहर घडेल - शैलेश पाटील

एकनाथ शिंदे साहेब मुख्यमंत्री झाले आणि त्यांचे तमाम कार्यकर्ते असणाऱ्या आम्हा सर्वांना अभिमान वाटला. शिंदे साहेबांचे नेतृत्व हे सर्वसामान्य कार्यकर्त्याला आणि सामान्य जनतेला न्याय देणार आहे. विकास कामांच्या बाबतीत बघतो, करतो अशी भूमिका शिंदे साहेबांची कधीच नसते. जनतेच्या हिताची काम तडकाफडकी करण आणि झटपट निर्णय घेणे ही शिंदे साहेबांची खासियत म्हणावी लागेल. नगरसेवक ते सभागृह नेते आणि त्यापुढे जाऊन ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री ते राज्याचे मुख्यमंत्री हा एकनाथ शिंदे साहेबांचा प्रवास कायमच लोकाभिमुख राहिला आहे. सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याची त्यांची भूमिका असल्याने आज त्यांना मानणारा मोठा वर्ग ठाणे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात धडाकेबाज काम करणारा नेता अशी शिंदे साहेबांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. महाराष्ट्रामध्ये जलद गतीने विकास व्हावा यासाठी मुख्यमंत्रीपदावर बसल्यानंतर शिंदे साहेबांनी घेतलेले निर्णय हे धाडसी आणि जनतेला न्याय देणारे आहेत. सर्व क्षेत्रात आज महाराष्ट्र आघाडीवर असलेला आपल्याला पाहायला मिळत आहे. विद्यार्थ्यांचे प्रश्न असोत, शेतकऱ्यांचे प्रश्न असोत, सर्वसामान्य जनतेचे प्रश्न असोत, या सर्वांवर मात करणारी भूमिका एकनाथ शिंदे साहेब घेताना दिसतात. शिंदे साहेबांचे नेतृत्वाखाली महाराष्ट्रात एका नव्या पर्वाला सुरुवात झाली आहे. सर्वसामान्य जनतेचे आरोग्य जपलं जावं यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी लोकांना मदतीची ठरत आहे. शिंदे साहेबांच्या नेतृत्वाखाली ठाणे जिल्ह्याचा विकास तर होत आहेच, मात्र दिवा शहराच्या विकासासाठी भरीव अशी तरतूद एकनाथ शिंदे साहेबांनी केल्याने व आम्हा कार्यकर्त्यांना बळ दिल्याने मागील पाच वर्षात दिवा शहराचा कायापालट झालेला आपल्याला पाहायला मिळतो. दिवा शहराचे डम्पिंग कायमचे बंद झाले हे एकनाथ शिंदे साहेबांनी दिलेल्या शब्दामुळेच शक्य झाले! शिंदे साहेबांनी जो शब्द दिला तो पूर्ण झाला अशीच त्यांची ख्याती असून त्यांनी दिवा शहराच्या विकासासाठी सर्व सहकार्य करण्याचा शब्द आम्हा सर्वांना दिलेला आहे. सर्व दिवावासीयांच्या पाठीशी एकनाथ शिंदे साहेब ठामपणे उभे आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये दिवा शहर आपल्याला बदललेले पाहायला मिळेल.दिवा शहरातील नागरिकांच्या घरांचा प्रश्न सोडवण्यासाठी क्लस्टर योजना दिवा शहरात लागू करण्याचा निर्णय झाला. दिवा हे आदर्श शहर घडवण्याच्या दृष्टीने शिंदे साहेबांचे मार्गदर्शन आम्हाला यापुढेही मिळत राहील. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांना वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा!

# सुतार-पांचाळ समाज दिवा यांच्या वतीने विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी!

## कार्यक्रमानिमित्त सत्यनारायण पूजा व हळदीकुंकू समारंभचे आयोजन







**दिवा:–** विश्वकर्मा सुतार पांचाळ समाज दिवा यांच्या वतीने शुक्रवारी विश्वकर्मा जयंती उत्सव मोठया उत्साहात पार पडला.यावेळी श्री सत्यनारायणाची महापूजा त्याचबरोबर महिलांसाठी हळदी कुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता.

यावेळी समाजातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सुतार पांचाळ समाज दिवा यांच्या वतीने श्री दत्तकृपा निवास पटांगण सद्गुरु नगर फेज १ दिवापूर्व येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी नागरिकांच्या मनोरंजनासाठी महान पौराणिक दशावतार नाटक पाप-पुण्य आयोजित करण्यात आले होते.प्रकाश पांडुरंग लब्दे प्रस्तुत श्रीदेवी भगवती दशावतार नाट्य मंडळ देवगड यांचे लोकप्रिय दशावतार नाटक दिव्यातील रसिकांसाठी श्री विश्वकर्मा सुतार पांचाळ समाज विवाह यांनी आयोजित केले होते. कार्यक्रमाला समाजाचे अध्यक्ष दिलीप पांचाळ, उपाध्यक्ष लक्ष्मण मिस्त्री, सचिव गणेश पांचाळ, दिलीप पांचाळ, सुभाष मिस्त्री, महादेव पांचाळ, यांसह अनेक कार्यकर्ते व महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मनसेच्या इशाऱ्यानंतर अखेर समाधान नगर मधील रहिवाश्यांना मिळाल्या नवीन सबलाईन वरून नळजोडण्या!



दिवा:-दिव्यातील समाधान नगर परिसरातील नागरिकांना गेले दोन महिन्यांपासून पाणी पुरवठा होत नव्हता.याबद्दल वारंवार पाठपुरावा करूनही महापालिका प्रशासनाकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने, मनसे दिवा शहरच्या पदाधिकाऱ्यांनी दिवा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्तांची भेट घेऊन दोन दिवसात समाधान नगरचा पाण्याचा प्रश्न न सोडवल्यास आयुक्तांच्या दालनासमोर बसून ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा दिवा मनसेने दिला होता.

मनसेच्या इशाऱ्यानंतर महापालिका प्रशासनाने युद्धपातळीवर कामाला सुरुवात करून नवीन पाण्याच्या सबलाईनचे काम पूर्ण करून सर्व नागरिकांना नवीन नळ जोडण्या जोडून देण्यास सुरुवात केली. दिलेल्या वेळेत काम पूर्ण केल्याबद्दल दिवा मनसेने महापालिका अधिकाऱ्यांचे देखील आभार


बाळासाहेबांची
शिवसेना
अनाथांचा नाथ...
आमचे मार्गदर्शक...
सर्वसामान्यांचे आधारस्तंभ...
दिवा वासीयांच्या पाठीशी
खंबीरपणे उभे राहणारे...
महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री!
एकनाथ शिंदे साहेब
यांना
वाढदिवसाचे अभिष्टचिंतन..
शुभेच्छुक
सौ.अर्चना निलेश पाटील
श्री.निलेश बाळाराम पाटील


बाळासाहेबांची
शिवसेना
महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री,
ठाणे जिल्ह्याचे आधारस्तंभ
दिवा शहराच्या विकासासाठी
दिवा वासियांच्या पाठीशी
ठामपणे उभे राहणारे..
संकटाच्या काळात
दिवावासीयांना आधार देणारे..
दिवा शहरातील समस्या कायमच्या सुटाव्यात
यासाठी निधीची कमतरता पडू न देणारे..
आमचे मार्गदर्शक... लोकप्रिय नेतृत्व,
महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री
मा.श्री. एकनाथजी शिंदे साहेब
९ फेब्रुवारी
यांना वाढदिवसाच्या मन:पुर्वक शुभेच्छा
- शुभेच्छुक -
रमाकांत मढवी
माजी उपमहापौर
शहरप्रमुख दिवा

# डम्पिंग विरोधात दिवा भाजपने दिवावासीयांना सोबत घेऊन निर्माण केलेल्या दबाव गटामुळे डम्पिंग ग्राउंड बंद करावे लागले!




## आमदार संजय केळकर व आमदार निरंजन डावखरे यांनी मांडली भूमिका



**दिवा:**–डम्पिंग ग्राउंड कायमचे बंद करण्याची घोषणा ठाणे महानगरपालिका आयुक्तांनी केल्यानंतर दिवा भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार संजय केळकर व आमदार निरंजन डावखरे यांची भेट घेऊन पेढे भरवुन आनंद व्यक्त केला.

भारतीय जनता पार्टीच्या ठाणे नेतृत्वाने डम्पिंग विरोधातील आंदोलनात नेहमीच दिव्यातील जनतेला यांना पाठिंबा दिल्याने व आंदोलनात सक्रिय सहभाग घेतल्याने दिवा भाजप मंडळाच्या वतीने दोन्ही आमदारांचे आभार मानण्यात आले.यावेळी बोलताना आमदार संजय केळकर म्हणाले की दिव्यात डम्पिंग विरोधात सातत्याने आंदोलन करण्याचा सपाटा भारतीय जनता पार्टीचे दिवा मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे व अन्य कार्यकर्त्यांनी सुरू ठेवला होता. भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातूनच डंपिंग विरोधात सर्वाधिक आंदोलन झाले.दिव्यातील जनतेचा आरोग्याचा हा प्रश्न असल्याने यासाठी पालिका आयुक्तांकडे आम्ही सातत्याने पाठपुरावा करत होतो. नवनियुक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी पदभार घेतल्यानंतर त्यांची भेट घेऊन हे डम्पिंग तातडीने बंद करण्यासाठी पाठपुरावा सुरू केला. अखेर जनतेच्या दबावा पुढे झुकून पालिका प्रशासनाने दिवा डंपिंग बंद केल्याचे संजय केळकर यांनी सांगितले. त्याचबरोबर दिवा भाजपचे सर्व पदाधिकारी मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे ठाणे महानगरपालिकेतील भाजपचे सर्व नगरसेवक गटनेते यांनी निर्माण केलेल्या दबाव गटामुळे पालिका प्रशासनाला दिवा डंपिंग बंद करण्याचा निर्णय घ्यावा लागला ,असे मत आमदार निरंजन डावखरे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले. यावेळी दिवा शहराध्यक्ष रोहिदास मुंडे ठाणे शहर कार्यकारणी सदस्य विजय भोईर अशोक पाटील ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष विनोद भगत सरचिटणीस समीर चव्हाण दिवा युवा मोर्चा अध्यक्ष सचिन भोईर महिला अध्यक्ष ज्योती पाटील ओबीसी मोर्चा अध्यक्ष रोशन भगत वार्ड अध्यक्ष नागेश पवार आदी दिवा भाजप मंडळातील पदाधिकारी उपस्थित होते.

# डम्पिंग ग्राऊंड बंद होणे हे दिव्यातील सर्वपक्षीय लढ्याचे यश!

**दिवा** – दिवा डम्पिंग ग्राउंड बंद झाले. हे डम्पिंग बंद व्हावे यासाठी मागील अनेक वर्षापासून दिव्यातील सर्वपक्षीय कार्यकर्ते व नेत्यांनी आंदोलन केली.दिव्यातील जनतेची मागणी लक्षात घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिवा डंपिंग कायमचे बंद करण्याचे आश्वासन दिव्यातील जनतेला दिले होते. त्या आश्वासनाची पूर्तता त्यांनी केली आणि दिव्याचे डम्पिंग कायमचे बंद झाले.

डम्पिंग बंदच्या घोषणेसाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानायला हवेत. २०१७ च्या पालिका निवडणुकीमध्ये त्यावेळी पालकमंत्री असणाऱ्या एकनाथ शिंदे यांनी दिवा डंपिंग बंद करू असे आश्वासन दिवा वासियांना दिले होते. तसे त्यावेळी मुख्यमंत्री असणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांनीही दिव्याच्या सभेत डम्पिंग बंद करू असे सांगितले होते.

दिवा डंपिंग हा गेली अनेक वर्ष दिवावासियांसाठी गंभीर प्रश्न बनला होता.या डंपिंग ग्राउंडच्या धुरामुळे दिवा शहरात आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता.शहरात धूळ आणि धुराचे साम्राज्य होते.दिवा डंपिंग ग्राउंड बंद व्हावे यासाठी २०१२ मध्ये त्यावेळी मनसेमध्ये असणारे व आता बाळासाहेबांची शिवसेना पक्षात असणारे शैलेश पाटील यांनी मोठे आंदोलन उभारलं होतं. सलग चार दिवस त्यांनी दिवा स्टेशन येथे उपोषण केले होतं. त्यानंतर भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून दिवा डंपिंग ग्राउंड बंद होण्यासाठी रोहिदास मुंडे यांनी पालिका मुख्यालय येथे गणेशाला साकडे घालण्याचे आंदोलन केलं, यावेळी त्यांना अटकही झाली होती.माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांनी डम्पिंग बंद होण्यासाठी मुख्यमंत्री व पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला.विजय भोईर,आदेश भगत,तुषार पाटील,राजकांत पाटील यांनी वेळोवेळी आपल्या स्तरावर दिवा डम्पिंग ग्राउंड बंद करण्यासाठी मागणी केली ,पाठपुरावा केला आहे .दिवा शहरातील अनेक सामाजिक संघटना व राजकीय पक्षांनी याबाबत कायम आवाज उठवला. मनसेचे अभिजीत पानसे यांनी दिवा डम्पिंग वर तळ ठोकून ठिय्या आंदोलन केलं. दिवा डंपिंग साठी दिवा शहरातील जवळपास सर्वच राजकीय पक्षांनी आपापल्या स्तरावर पाठपुरावा केलेला आहे. दिवा शहरासाठी घातक असणारे आणि येथील नागरिकांच्या आरोग्याचे कारण बनलेलं दिवा डम्पिंग ग्राउंड बंद व्हावे यासाठी वृत्तपत्र व वृत्तवाहिन्या यांनीही वेळोवेळी आवाज उठवला व या प्रश्नाला वाचा फोडली. हे डम्पिंग बंद व्हावं अशी अनेक नागरिकांनी काही वर्षांपासून मागणी केलेली आहे.सर्व दिवावासीयांच्या वतीने ही मागणी मंजूर केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ठाणे महानगरपालिका प्रशासन यांचे दिवावासीय नक्की आभार मानतील. दिव्यातील डम्पिंग ग्राउंड बंद होत असताना दिवा शहरात अनेक भागात असणारी छोटी छोटी डंपिंग ग्राउंड ज्या ठिकाणचा कचरा उचलला जात नाही. ती देखील येणाऱ्या काळात ठाणे महानगरपालिका बंद करेल आणि दिवा स्वच्छ सुंदर शहर बनेल अशी अपेक्षा या निमित्ताने करायला हरकत नाही!




# डोंबिवली येथील कबड्डी स्पर्धेला मान्यवरांची उपस्थिती!

**डोंबिवली:**–डोंबिवली पश्चिम येथे भारतीय जनता पार्टी नगरसेवक विकास म्हात्रे आयोजित भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी चषक या भव्य कबड्डी स्पर्धा कार्यक्रमाला महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री नामदार रवींद्र चव्हाण ,माजी आमदार नरेंद्र पवार,भाजपचे प्रदेश सरचिटणीस भटके विमुक्त आघाडी,ठाणे जिल्हा कबड्डी संघटनेचे अध्यक्ष नगरसेवक श्री कृष्णा पाटील, संयोजक नगरसेवक विकास म्हात्रे, नगरसेविका कविता म्हात्रे,युवा मोर्चा अध्यक्ष पाटील, श्री प्रदीप जोशी, श्री दसरथ म्हात्रे ,श्री बाळाशेठ, श्री माणिक म्हात्रे ,श्री विशाल भाने व अन्य लोक उपस्थित होते.

# दिव्यात नव्या काँक्रीटच्या रस्त्याला अवघ्या दोन दिवसात तडे

## निकृष्ट दर्जाचे काम असल्याचा भाजपचा आरोप



**ठाणे:** दिव्यातील साबे गाव स्मशान भूमीच्या दिशेने जाणारा नव्याने युटिडब्ल्यूटी पध्द्तीने करण्यात येणाऱ्या सिमेंट काँक्रीटिकरणाच्या रस्त्याला अवघ्या दोन दिवसात तडे गेल्याची बाब भाजपाने व्हायरल केलेल्या व्हिडीओ द्वारे उघडकीस आलेली आहे. त्या रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप करत हे काम करणाऱ्या ठेकेदारावर कठोर कारवाई करा तसेच त्याला बील ही अदा करून अशी मागणी भारतीय जनता पार्टी दिवा विभागाने केली आहे. कारवाई न झाल्यास आंदोलन केले जाईल असा इशाराही त्यांनी दिला.

गेल्या काही वर्षांपासून दिव्यात रस्त्यांची कामे सुरू आहे. काही रस्ते झाले पण, त्या रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाचे असल्याने ते रस्ते फोडून तेथे नव्या रस्त्यांची करण्याचे काम आता सुरू आहे. असा आरोप भाजपने केला आहे. गेल्या तितके वर्षांपासून दिवा – आगासन हा रस्ता अद्यापही पूर्ण झाला नसल्याचे भाजपने म्हटले. त्यातच, दिवा आगासन, ग्लोबल शाळा ते दातीवली रेल्वे फाटक, दिवा स्टेशन ते साबे गाव विठ्ठल मंदिर आणि शाळा क्रमांक ८० ते साबे गाव स्मशान भूमी या चार रस्त्यांची कामे सुरू आहेत. त्यामधील साबे गाव स्मशान भूमी रस्त्याला अवघ्या दोन दिवसात तडे गेले आहेत. ही बाब उघडकीस आणून ही कामे किती निकृष्ट दर्जाची आहेत. हे पुन्हा एकदा समोर आले आहे. त्यामुळे अशी कामे करणाऱ्या ठेकेदारांना काळया यादीत टाकावे, त्यांची बिले अदा करू नये. तसेच संबंधित जबाबदार महापालिका अधिकाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी भाजपचे दिवा शहर अध्यक्ष रोहिदास मुंडे यांनी केली आहे. जर कारवाई झाली नाहीतर भाजप पदाधिकाऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. तसेच भाजप आमदार संजय केळकर व आमदार,ठाणे जिल्हा अध्यक्ष निरंजन डावखरे यांच्या नेतृत्वाखाली दिवा भाजप शिष्टमंडळ लवकरच महापालिका आयुक्तांची भेट घेणार आहे.




सामान्य नागरिकांच्या
कायम पाठीशी उभे राहणारे...
विकासाचे व्हिजन असणारे
महाराष्ट्राचे
सन्मानीय
मुख्यमंत्री
मा.श्री.ना.
एकनाथजी
शिंदे साहेब यांना
९
फेब्रुवारी
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक : संजय भगत समाजसेवक, दिवा